| दिनांक 19/03/2025 |
| --- |
| 1 पेण पोलीस ठाणे हद्दीत दिनांक 18/03/2025 रोजी 19:00 वा च्या सुमारास मौजे दुरशेत ता.पेण महिला फिर्यादी यांची मुलगी ही आरोपीत नं.03 याचे बरोबर पळुन जावुन लग्न केल्याबाबत विचारणा करण्यासाठी फिर्यादि व साक्षीदार गेले असता सदर ठिकाणी वादावादि होवुन त्यांचेत बाचाबाची सुरु असताना आरोपीत नं.01 ते 03 यांनी आपसांत संगनमत करुन फिर्यादि व साक्षीदार यांना शिवीगाळी करुन हाताबुक्कयांनी मारहाण केली, तसेच आरोपीत नं.02 हिने घरातील हातोडी घेवुन फिर्यादि यांचे डोक्यात मारुन दुखापत केली.<br>याबाबत पेण पोलीस ठाणे गुरनं.46/2025, BNS 118(1),115,352,3(5) प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला असून अधिक तपास मपोह/पाटील हे करीत आहेत. |
| 2. अलिबाग पोलीस ठाणे हद्दीत दिनांक 08/03/2025 रोजी 19:00 वा ते दि. 18/03/2025 रोजी 19:00 वा च्या दरम्यान मौजे नेचरएज रिसॉर्ट परहुरपाडा येथुन ता.अलिबाग येथे 02 आरोपित रा.परहुर ता.अलिबाग यांनी महिला फिर्यादी नणंद यांच्या नेचर एज रिसॉर्ट मध्ये पाठीमागील पत्रे पाडुन प्रवेश करुन रिसॉर्ट मधील रुम चे लॉक कोणत्यातरी हत्याराने तोडुन घर फोडी करुन रुम मधील टिव्ही व गिझर असा एकूण 78,000/-रुपये किमतीचा माल चोरुन नेला. सदर गुन्ह्यातील 02 आरोपित यांना दिनांक 19/03/2025 रोजी 16:40 वा च्या सुमारास अटक करण्यात आली आहे.<br>याबाबत अलिबाग पोलीस ठाणे गुरनं.53/2025 भारतीय न्याय संहिता 305,331(1) ,331(4) प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला असून अधिक तपास सपोनि/श्री.फार्णे हे करीत आहेत. |
| 3. पेण पोलीस ठाणे हद्दीत दिनांक 18/03/2025 रोजी 20:00 वा च्या सुमारास मौजे दुष्मी वडमाळवाडी ता.पेण येथे महिला फिर्यादी या त्यांचे घराचे बाहेर रस्त्यावर उभी असताना आरोपीत याने फिर्यादि या त्यांचे गावातील महीलांसोबत पोलीस स्टेशनला गेल्या याचा राग मनात धरुन लाकडी फाटयाने फिर्यादी यांचे पोटावर ,उजवे पायाचे मांडीवर,उजवे हाताचे दंडावर उपट मारुन दुखापत व शिवीगाळ करुन जिवे ठार मारण्याची धमकी दिली.<br>याबाबत पेण पोलीस ठाणे गुरनं.50/2025, भा.न्या.सं.2023 कलम 118(1),352, 351(2) प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला असून अधिक तपास पोह/टेमकर हे करीत आहेत. |

4. पोयनाड पोलीस ठाणे हद्दीत दिनांक 01/06/2024 रोजी 00:00 वा ते दि. 01/11/2024 रोजी 00:00 वा च्या दरम्यान मौजे वाघजाई येथे पिडीत मुलीच्या राहत्या घरी आरोपीत व पिडीत हीचे जुन 2024 पासुन प्रेम संबंध होते पिडीत मुलगी ही अल्पवयीन असल्याचे आरोपीत यास माहीत असताना यातील आरोपीत यांने पिडीत हीला लग्न करण्याचे अमिष दाखवुन तीच्या सोबत वारंवार शारिरिक संबंध करून ती सात महीन्याची गरोदर राहुन तीची दिनांक 17/03/2025 रोजी सिव्हील हॉस्पीटल अलिबाग येथे प्रसुती होवुन मुलगा झाला तरी आरोपीने तिच्याशी लग्न नाही केले.

याबाबत पोयनाड पोलीस ठाणे गुरनं.26/2025,भा.न्या.संहिता कलम भारतीय न्याय संहिता कलम 69 सह बालकांचे लैगिंक अपराधापासुन संरक्षण अधिनियम 2012 चे कलम 4,6 प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला असून अधिक तपास सपोनि/श्री.संतोष दराडे हे करीत आहेत.

5. कर्जत पोलीस ठाणे हद्दीत दिनांक 19/03/2025 रोजी 18:30 वा च्या सुमारास मौजे रा. बार्डी पो.कोषाणे ता.कर्जत येथे फिर्यादी यांचे राहते घराच्या अंगणात फिर्यादी यांचे घराचे शेजारी राहणारी महिला आरोपी नं.04 ही फिर्यादी यांचे घराचे अंगणात झाडु मारत होती फिर्यादी यांची पत्नी साक्षीदार हिने तिस आमचे दारात कसाला झाडू मारतेस असे बोलल्याने तिला त्या गोष्टीचा राग आल्याने तिने फिर्यादी यांचे पत्नीस शिवीगाळी दमदाटी करण्यास सुरवात केली म्हणुन फिर्यादी हे आरोपीत क्रमांक 4 हिस समजावत असताना तेथे हजर असलेले 03 आरोपित यांनी फिर्यादी यांना शिवीगाळी व दमदाटी करण्यास सुरवात केली व त्यापैकी आरोपी नं.02 यांनी त्यांच्या हातातील कोणत्यातरी धारदार हत्याराने फिर्यादी यांच्या उजव्या हातावर मारून हाताचे बोटास जखम केली फिर्यादी यांचा मुलगा हा त्यांच्यामधील वाद सोडवण्यासाठी आला असता आरोपी नं.02 याने साक्षीदार क्र.02 यांचे देखील कपाळावर धारदार हत्याराने दुखापत केली.

याबाबत कर्जत पोलीस ठाणे गुरनं.82/2025, भारतीय न्याय संहीता कलम 118(1), 352, 351(2),3(5) प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला असून अधिक तपास पोह/काठे हे करीत आहेत.

6. माणगाव पोलीस ठाणे हद्दीत दिनांक 19/03/2025 रोजी 07:00 वा तक्रारदार यांच्या घरासमोरील रस्त्यावर काकल गौळवाडी, पो. साइ. ता.माणगाव येथे फिर्यादी व आरोपीत हे एकाच गावातील रहिवासी असुन फिर्यादी यांनी पालखीच्यादिवशी घरासमोरील साफसफाइ का केली नाही असे आरोपीत यास विचारले या गोष्टीचा आरोपीत यांस राग आल्याने त्यांनी संगणमत करुन फिर्यादी यांस लाकडी काठीने मारहाण करुन हाताबूक्याने मारहाण केली व शिविगाळ करुन जिवेठार मारण्याचा धमकी दिली.

याबाबत माणगाव पोलीस ठाणे गुरनं.69/2025 भा.दं.वि.क.118,118(1)115(2) 351(2) 352(2)3,5, प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला असून अधिक तपास पोह/आशिष समेळ हे करीत आहेत.

## **वाहतूक केसेस**

दिनांक 19.03.2025 रोजी 28 पोलीस ठाण्याच्या अखत्यारीत वाहतुक शाखेचे अधिकारी व कर्मचारी यांनी वाहतुकीचे नियम भंग करणा-या एकूण 143 इसमावर कायदेशीर कारवाई करण्यात आली असून त्यांच्याकडून 1,46,250/-रुपये इतका दंड आकारला आहे.